# लॉकडाऊन लूकडाऊन

बाळासाहेब शिंपी



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# लॉक डाऊन - लूक डाऊन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

लघुपटकथा

# लॉक डाऊन - लूक डाऊन

## लेखक : बाळासाहेब सुधाकर शिंपी

# लॉक डाऊन - लूक डाऊन


## लेखक : बाळासाहेब सुधाकर शिंपी

मेहरुण परिसर, जळगांव ता.जि.जळगांव. (खान्देश)

मो. नं. ९९२१७२९४७५.

ईमेल आयडीः- balasaheb.siddesh@gmail.com.



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

**Whatsapp: 9987737237**

प्रकाशन : १८ नोव्हेंबर २०२१(कार्तिक श्

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

!! श्री!!

श्री स्वामी समर्थ

प्रत्येकवेळी मला साथ देणारे व माझ्या सुख दुखाःत सदैव माझ्या सोबत असणाऱ्या माझ्या आई वडीलांना माझं हे पुस्तक समर्पीत

“ लॉक डाऊन - लूक डाऊन “

सदर कथा पुर्णतः काल्पनिक असून यांतील पात्र व त्यांची नांवे तसेच स्थळ पुर्णतः काल्पनिक आहे. याचा कुठल्याही जीवंत अथवा मृत व्यक्तीशी काहीएक संबंध नाही. असल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. कुणाच्या भावना दुखावणे हा आमचा हेतू नसून सदर कथा केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने लिहीण्यात आलेली आहे.

# मनोगत



नमस्कार मित्रहो, तशी मला लेखनाची आवड लहानपणापासूनच, कविता, लेख लिहीणे हा माझा आवडता छंद माझ्या काही कविता व लेख वृत्तपत्रातही छापून आलेत. लेखनासाठी व्यासपीठ मिळावं म्हणून मी सकाळ वृत्तपत्रासाठी रिपोर्टर म्हणून तर महाराष्ट्र टाईम या वृत्तपत्रामध्ये काँलेज क्लब रिपोर्टर म्हणून काँलेजला असतांना काम केलं. माझं शिक्षण जेमतेम बी.ए पर्यंत झालं असून परीस्थीतीमुळे मला पुढे शिकता आलं नाही. काम करुन शिक्षण करणं हे मला परवडण्यासारखां नव्हतं. म्हणून मी पुढे शिकू शकलो नाही. काही दिवस मी एका स्थानिक न्युज चैनलला उपसंपादक म्हणून काम केलं. तसेच मी स्वतःच सा.वृत्तपत्र सूरु केलं. पण तेही बंद केलं. आपलंही एखाद पुस्तक प्रकाशित व्हावं व ते वाचकां पर्यंत पोहचावं अशी ईच्छा होती. पण पुस्तक प्रकाशित करण्यासाठी येणारा खर्च मला परवडण्या सारखा नव्हता. म्हणून बघितलेलं स्वप्न पुर्ण होईल की नाही? असा प्रश्न मनात

होता. मग मी एक दिवस ई पुस्तक असां नेटवर सर्च केलं. तर मला "ई साहित्य प्रतिष्ठान" विषयी माहिती मिळाली. व मी ई प्रतिष्ठानच्या 'ई साहीत्य' वेबसाईटवरुन बरीच पुस्तकेडाऊनलोड करुन वाचली यांत मुख्यत्वे कादंबऱ्या होत्या. ई प्रतिष्ठानच्या या अनोख्या उपक्रमामुळे मला लिहिण्याची प्रेरणा मिळाली. व मी माझ्या मोबाईलमध्येच असलेल्या मायक्रोसाॅंप्ट वर्डचा उपयोग करुन माझी लघुपट कथा लाॅंकडाऊन लुकडाऊन ही कथा मी एक महिन्यात पूर्ण करु शकलो. गेल्या काही दिवासांपासून कमी रक्तदाबाच्या त्रासाने त्रस्त आहे. माझेवर उपचार सुरु आहेत. मात्र अशा परिस्थितीत मी परमेश्वरकृपेने माझं हे तिसर ईपुस्तकाच लेखन पुर्ण करु शकलो. ई साहित्य प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केलं त्या बद्दल ई साहित्य प्रतिष्ठानचे मनापासून आभार! माझं हे लेखन तुम्हाला आवडेल की नाही माहीत नाही? कारण मी काही लेखक नसून नवखा व्यक्ती आहे. आपली प्रतिक्रिया नक्की कळवा.

आपला

बाळासाहेब सुधाकर शिंपी, मेहरुण परिसर,

जळगांव. ता. जि. जळगांव (खान्देश) पिन कोड – ४२५००१.

# मराठी पटकथा

# लॉक डाऊन - लूक डाऊन

## सिन नं. :- १

(दूपारची वेळ आंट्या सिगारेटचा झुरका ओढतं आपल्या घरात बसलाय. तितक्यांत त्याची बायको निशिता त्याला आवाज देते.)

निशिताः- आंट्या ऐकतोयस का? किती दिवसं हातात हात धरुन बसशिल असचं? घरात बसून, बसून थोडी कोणी आयतं खायला आणून देणार आपल्याला.

आंट्याः- मग काय करणारं? लॉकडाऊननं जाम करुन टाकलं साऱ्यांना.....

निशिताः- मग नुसतंच सिगारेटच्या धुरात पैसे बरबाद करत बसशिल का?

आंट्याः- मगं काय करणारं? दुसरं कामच कुठयं आता उरलेलं. टि.व्ही बघा आणि घरातच बसा. एवढच काम. त्यात सारख्या ' कोरोनाच्या बातम्या ऐकून, ऐकून लई पकवलयं

या टि.व्ही वाल्यांनीही. वाटतं टि.व्हीवरच काहीतरी हाणून फेकावं. (आंट्या हसत, हसत बोलतो.)

निशिताः- मगं टिव्हीवर संताप काढण्यापेक्षा का नाही तु भाजी विकू शकतं? त्यातून तरी दोन पैसे मिळतील आपल्याला लाँकडाऊनमध्ये तेवढाच आधार होईल.

आंट्याः- मी अनं भाजी विकू.... काय बोलतेय कळतयं का तुला?

निशिताः- जे खरयं तेच बोलतेय. थेटरबंद असल्याने तुझे शो ही तसे बंदच आहेत ना? मग असचं लाँकडाऊन उघडायची वाट बघत बसलास तर कसं होईल आपलं?

आंट्याः- होईल ते होईल तुला कायं त्याच?

निशिताः- मला काय म्हणजे? आंट्या अरे शुध्दीवर आहेस ना तू? सकाळीसच फ्लँटवाल्याचा फोन आला. मागील तीन महिन्याचं तरी रेंट पे करा म्हणून. काँलनीतल्या किराण्या वाल्याच बिल थकलयं. आधी मागील बाकी द्या तरच उधार मिळेल म्हणाला तो. कसं होणार?

आंट्याः- होऊदे झाल ते होईल. पण भाजी विकणं ते आपल्या पर्सनालीटीला नाय शोभणार! अख्खा महाराष्ट्र ओळखतो आपल्याला.

निशिताः- ओळखतो ही चांगली बाब आहे. पण अरे कोणी येणार आहे का? आपली चौकशी करायला. हे जिवंत आहेत की, मेले म्हणून? आपला नाही तर केवळ मुलांचा तरी विचार कर.... प्रसिध्दीची नशा उतरवून जरा फॅमिलीकडे बघं आंट्या.

आंट्याः- ये निशे जास्त डोकं खाऊ नकोस. तु का? नाही जात मगं. घरकाम करायला. तेवढेच दोन पैसे येतील.

निशिताः- आंट्या, आंट्या अरे काय बोलतोयस तू? मी अनं घर कामाला जावू आणि तेही मोलकरीन म्हणून. काही कळतय का तुला?

आंट्याः- व्यावसायिक रंगभूमी गाजवणा- या एखाद्या अभिनेत्याने गल्लोगल्ली जाऊन भाजी विकाकावी. हे बोलतांना तुला लाज कशी वाटली नाही.   मग त्यात एका अभिनेत्याच्या

पत्नीने मोलकरीन म्हणून काम केल तर त्यात काय चूकीचं? असही आता सगळ बंद आहे आणि त्या शिवाय तुला दूसर कामही कोण देणार नाही.

नीशिताः- खरयं तुझं. याचसाठी लग्न केलयंना मी तुझ्याशी? मी मोलकरीन म्हणून कोणाकडे काम केलं तर लोक नांव नाही ठेवणार का?

आंट्याः- ठेवलं तर ठेऊदे....! असंही कोण ओळखतं तुला? मला तरी लोक नुसतं नावानेच नाही, तर चेहऱ्यानेही ओळखतात. असाच अभिनेता झालो नाही मी!

निशिताः- प्रसिध्दीच्या मिजाजात राहून परिवाराला भुकं मारण्यापेक्षा मिळेल ते काम करुन परिवाराला जगवणं यालाच खरा पुरुषार्थ म्हणता येईल. करेल मी मोलकरीन म्हणून कामं! तुझापुरुषार्थ संपला असेल तर.

आंट्याः- निशे तू मोलकरीण म्हणून काम करणार शक्यच नाही. (आंट्या हसत हसत बोलतो.)

निशिताः- आंट्या पुरे झाली आता मस्करी! युजलेस.

आंट्याः- निशे तोंड सांभाळ आता. नाहीतर????

निशिताः- नाहीतर काय करणार आ? काय करणार?

आंट्याः- निशे तोंड सांभाळ म्हणतोय. तोंड बंद कर आता.

निशिताः- नाही तर काय करशिल?

आंट्याः- काय करशिल बघ मग.....

(आंट्या संतापात टि. व्ही वर बाजूच्याच टेबलावर ठेवलेला पेपरवेट ठोकळा मारुन फेकतो. तो निशिताला लागणार तितक्यात ती खाली वाकते आणि तो ठोकळा टि.व्हिवर जावून आदळतो. आणि टि.व्ही. फुटतो. निशिता जोरात ओरडते.)

निशिताः- आई गं..... (निशिता रडत बसते; तर आंट्या संतापात बाहेर निघून जातो.)

**सिन संपतो.**

## सिन नं. २

(आंट्या पैशाची चणचण असल्याने एका निर्मात्याकडे अँडव्हान्स घेण्यासाठी जातो.)

शामकांतः- ये, ये आंट्या अरे आज कशी काय आठवण झाली आमची?

आंट्याः- सर जरा काम होतं म्हणून आलो. म्हटल चला सरांना भेटून घेऊ.

शामकांतः- बरं झाला आला तर....! काय घेणार थंड की गरम?

आंट्याः- नाही काही नको सर.....

शामकांतः- अरे असं कसं? बऱ्याच दिवसांनी आलास आणि असं कसं नाही म्हणतोय. काही तर घे....

आंट्याः- नाय नको.

शामकांतः- बरोबर समजल मला. तू मोठा आघाडीचा अभिनेता झालायसना मग आमच्या सारख्या गरिब डायरेक्टरांसोबत तू कसा काही घेणार? आंट्या पांडे..... (शामकांत हसतात.)

आंट्याः- नाही सर तस काही नाही. मी आज जी काही प्रसिध्दी मिळवलीय ही तुमच्यामुळेच मग मी कसला मोठा आला? खरतरं तुम्हीच माझ्या पेक्षा मोठे आहात. आज पर्यंत तुम्ही व्यावसायिक रंगभूमीवर अनेक कलाकारांना संधी देत त्यांच करिअर घडवलं. विशेषतः माझ्या सारख्या छोट्या शहरातील कलाकारांना तुम्ही संधी दिली. याबद्दल तुमचे आभार मानावे तितके थोडे.

शामकांतः- रिलॅक्स आंट्या, घे थोडा थोडा पॅक घेऊया.....

आंट्याः- बरं तुम्ही म्हणताय सर म्हणून तुमचा मान ठेवतो.

शामकांतः- शराबी नही हम लेकीन शौक ऐसा लग गया शराब का यारो हमे नशा चढ गया.....

(गाणं गुणगुणतं, फ्रिजमधून बॉटल काढतो व टेबलावर ठेवतो.)

चिअर्स,

आंट्याः- चिअर्स

शामकांतः- बोल आंट्या काय काम काढलं होतं?

आंट्याः- सर जरा पैसे हवे होते.

शामकांतः- पैसे..... (शामकांत हसत बोलतो.) अरे काय मजाक लावलीय आंट्या.....? तुझ्या सारख्या दिग्गज अभिनेत्याला पैशाची अडचण येणं शक्यच नाही.

आंट्याः- मजाक नाही सर! मला खरच पैशाची गरज आहे. लॉकडाऊनमुळे संगळ बंद झालय. होत नव्हत खर्च झालं. म्हणून थोडे पैसे हवे होते.

शामकांतः- स्वारी आंट्या..... माझ्याकडे थोडी ना पैशाच झाड आहे इथं. कोणीही यावं आणि हवे तेवढे पैसे घेऊन जावं. तुला माहितीय आपली परिस्थिती. लॉकडाऊनमुळे एकही शो करता आला नाही. सिरियलच शुटींगही थांबल. त्यात तुम्ही लोकांनी घेतलेले अँडव्हान्स पैसे..... आता कुठून आणायचा आम्ही प्रत्येक वेळी पैसा? स्वारी बॉस नाही करु शकत मी तुझी मदत. स्वारी!

आंट्याः- सर प्लिज, लाँकडाऊन संपल्यावर परत करेन मी तुम्हाला तुमचे पैसे.

शामकांतः- स्वारी आंट्या नाही देवू शकत मी तुला पैसे लाँकडाऊन नंतर शुटींग सुरु झाल्या नंतर बघू.

आंट्याः- बर येतो सर मी!

शामकांतः- अरे आंट्या कुठ निघालास...? एवढा पेक तर संपवं मग जा.....

(आंट्या दारुने भरलेला ग्लास रिचवतो आणि तेथून निघतो.

आंट्याः- (काहीसा नाराज होऊन) येतो सर मी बाय......

शामकांतः- बाय आंट्या..... (आंट्या काही अंतरावर गेल्यावर शामकांत स्वतःशी पुटपुटत बोलतो.) एरव्ही भाव खातात साले. प्रसिध्दीचा माज यांना आणि आता लाँकडाऊन काय झाला लागले पैशासाठी आमच्याच पाया पडायला. आमच्या शिवाय कोण पुसतं यांना. तरी एवढा भाव खाता हे लोक बघितलं.

## सिन नं. ३

(आंट्या मोटरसायकल घेऊन निघून जातो. आणि एका निवांतस्थळी तो जातो.)

आंट्याः- क्या साली जिंदगी? हाताला काम असलं तर ठिक होतं. नाही तर जिंदगी कुचकामीच ठरते. निशिता बरोबर सांगत होती. उगाच संताप काढला मी तिच्यावर! मी असं करायला नको होतं. मी तिची माफी मागायला हवी. नाही, नाही पण मी कोणतं तोंड घेऊन जावू तिच्याकडं? त्यापेक्षा मी सर्व ठिक होई पर्यंत कुठेतरी दूर निघून गेलेलच बरं....

(बाजूलाच एक व्यक्ती खोकलत असतो. व थंडीने गारठून कुडकुडत बसलेला असतो.)

आंट्याः- ऐ बाबा अरे काय खोकलतोयेस रे तू. कोरोना झाला की काय तुला? चल आंट्या उगाच तुलाही कोरोना झाला म्हणजे?

(आंट्या दारुच्या नशेत स्वतःशी बोलत तेथून निघून जातो. तर आंट्या त्याच जाकीट मात्र त्याच जागी विसरतो.)

## सिन नं. ४

(रस्त्याच्याकडेला एक इसम झोपलाय तो खुप खोकतोय. थंडीने कुरकडत असलेला तो व्यक्ती त्याचा हात वर बैठक भिंतीवर जातो तर त्याच्या हाताला जाकीट लागत तो ते घालून घेतो. तर बाजूलाच एक व्यक्ती कोणाला तरी फोन करत असतो. काही वेळा नंतर अँब्युलन्स येते व त्या इसमाला घेऊन जाते.)

## सिन नं. ५

(त्या पेशंटला हाँस्पिटलला आणल जातं.)

डाँक्टरः- ओ हि इज इमरजन्सी पेशंट. सिस्टर या पेशटंचे त्वरीत रिपोर्ट करा. आणि पाँझिटीव्ह असेल तर आय.सी.यु. ध्ये दाखल करा याला. लगेच.

सिस्टरः- yes sir!

## सिनं. नं. ६

(आंट्या मोटरसायकल चालवत विचार करतो.)

आंट्याः- काय साली जिंदगी? बायकोही साथ सोडून जाणार म्हटल्यांवर आपलं अस्तित्व तरी काय राहणार? त्यांपेक्षा ती म्हणतेय तेच करुया! भाजीपाला विकूया. लाँकडाऊन उघडल्यांवर होईल सगळं ठिक मग जाऊया घरला. पण मला कोणी ओळखलं तर? नाही त्यापेक्षा आपला लूक बदलवून भाजी विक्री करतो. म्हणजे कोणी ओळखणार नाही.

## सिन नं. ७

(इकडे निशिता चिंतेत आंट्या अजून घरी परतला नाही. म्हणून ती त्याला सारखा कॉल करते. पण त्याचा फोन बंद असतो.)

निशिताः- शीट्! याचा फोनही बंद येतोय. कुठ गेला असणार हा?

समरः- (आंट्याचा मुलगा) मम्मी पापा कधी येणार?

दिव्यांशाः- (आंट्याची लहान मुलगी) हो मम्मी पापा कुठं गेलेय? कधी येणार?

निशिताः- होय येतील बेटा इतक्यात. तुम्ही जा आणि झोपा बेडरुममध्ये रात्र खुप झालीय.

समरः- नाही मम्मी.... पप्पा आल्याशिवाय आम्ही नाही झोपणार!

निशिताः- झोपून रहा बेटा रात्र खूप झालीय.

दिव्यांशाः- नाही मम्मी पप्पा येतील तेंव्हाच आम्ही झोपणार.

निशिताः- काय करावं काही कळेनास झालयं? कुठे गेला असणार हा आंट्या? मी त्याला बोलायला नको होत. (निशिताला पश्चाताप होतो. निशिता शामकांतला फोन करते.)

निशिताः- सर मी निशिता बोलतेय. आंट्या आलाय का तिकडे?

शामकांतः- होय आला होताना. भिकारडा साला. पैसे मागत होता उसनवारी.... पण नाय दिले मी.... तु पण त्याच्याशी लग्न केलं. आपल्यासोबत राहिली आसती तर ऐश झाली असती. ग्लँमरच्या मागे धावली होतीसना तू! आता गेली हवा, फुस झाली. तुझीही अनं त्या आंट्याचीही. (शामकांत दारुच्या नशेत हसतो.)

निशिताः- सर प्लिज, प्लिज..... आहे का तो तिथं? प्लिज माझं बोलनं करुन द्या हो त्याच्याशी. त्याचा फोनही बंद येतोय.

शामकांतः- तो आला होता आणि गेलाही कधीच.

निशिताः- केंव्हा आला होता सांगाल का?

शामकांतः- दूपारीच आला एकपेग घेतला आणि निघाला.

निशिताः- कुठं जातोय काही सांगितलं का त्याने?

शामकांतः- नाही सांगितलं मला काही. पण तू ये माझ्याकडे सांगतो तुला.

निशिताः- (फोन कट करते व रडते. पुन्हा कोणाला फोन करावा? असा विचार निशिता करते. म्हणून ती आंट्याचा मित्र धवलला फोन करते.)

## सिन नं. ८

(धवल झोपलाय. निशिता त्याला बऱ्याचदा कॉंल करते पण तो कॉंल रिसिव्हच करत नाही.)

धवलः- कोण सालं इतक्या रात्री झोपमोड करतयं? सकाळी कर म्हणा कॉंल.

(असं म्हणत तो निशिताचा फोन कट करतो.)

निशिताः- धवलही फोन उचलत नाही. अरे धवल फोन उचल प्लिज.....

(निशिता स्वतःशी पुटपुटते. रात्रीचे दोन वाजलेत. निशिता शेवटचा पर्याय म्हणून तिच्या एका मैत्रिनीला फोन करते.)

निशिताः- हॅंलो मैथीली....

मैथिलीः- हा बोल निशिता काय झाल? इतक्या रात्री कॉंल केलास.

निशिताः- अगं ऐक ना.... आंट्या अजून घरी आला नाही. मला खुप भिती वाटतेय गं. कुठं गेला असणार कुणास ठाऊक.

मैथिलीः- अगं येईल तो! कुठं जाणार?

निशिताः- अगं रात्रीचे सव्वा दोन वाजलेत. अजून कसा आला नाही आंट्या? मला खरच खुप भिती वाटतेय गं.

मैथिलीः- झोप आता! मला झोप येतेय. सकाळी बोलूया का आपण?

निशिताः- मैथिली अगं माझं ऐक तर खरं..... पोलिसांत तक्रार द्यावी असच  वाटतय मला.

मैथिलीः- निशिता तू झोप आता.... मी सकाळी येते तुझ्याघरी. तेंव्हा बघू काय करायच ते.

निशिताः- (काहीसी नाराज होते व फोन कट करत झोपून जाते. मुलही सोप्यावर झोपून जातात. पण निशिताला का झोप येत नाही.)

## सिन नं. ९

(सकाळ झालीय.... मैथिली निशिताच्या घरी पोहाचते. दाराची बेल वाजवून वाजवून थकते. पण निशिता काही केल्या दार उघडना.... मैथिली तिला कॉलही करते पण निशिता झोपेत असल्याने तो रिसिव्ह करु शकत नाही. मैथिली दारावरची बेल वाजवतच राहते. त्या बेलच्या आवाजाने निशिताला जाग येते निशिता दार उघडते. समोर मैथीली उभी असते.)

मैथिलीः- गुड मॉर्निंग..... काय निशिता इतका वेळ लावायचा का? दार उघडायला. मी केंव्हाची बेल वाजवतेय. कॉल करतेय. पण तू फोनही उचलत नव्हती.

निशिताः- अगं रात्रभर जागून जरासी डुलकी आली आणि सकाळी सकाळी झोप लागली.

मैथिलीः आंट्या आला का घरी?

निशिताः- नाय गं अजून! कुठं गेला असेल काय माहित?

मैथिलीः- तू काळजी करु नकोस. आपण आधी पोलिसांत तक्रार देवूया.

निशिताः- मलाही तेच वाटतयं.

मैथिलीः- तू तयार हो लवकर. मग निघूया आपण.

निशिताः- हो मी लगेच तयार होते आणि मग निघूया आपण!
(निशिता आंघोळ करुन तयारी करते. आणि मुलांनाही तयार होण्यास सांगते.)

निशिताः- समर, दिव्यांशा उठा पटकन! आपल्याला बाहेर जायचय.

समरः- आई आले का गं पप्पा घरी?

निशिताः- नाही आले अजून. तुम्ही तयार व्हा बघू पटकन....

दिव्यांशाः- मम्मी केंव्हा येतील गं पप्पा?

मैथीलीः- तुम्ही तयार व्हा बेटा.... आपण त्यांनाच शोधायला जातोय.

समर व दिव्यांशाः- हैय...... (आनंदात)

निशिताः- चला पटपट तयार व्हा.

(निशिता, समर व दिव्यांशा आंघोळ करुन तयार होतात व निशिता मैथिलीला बोलते.)

निशिताः- चल मैथीली.... निघूयात आपण!

मैथीलीः- हो चल निशिता निघूया.

(निशिता समर व दिव्यांशाला सोबत घेत मैथीली सोबत पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी निघतात.)

## सिन नं. ९ -ब

(पोलिस स्टेशनमध्ये साहेब बसलेत. हवालदार आरोपींना घेऊन जाताहेत. तितक्यांत निशिता व मैथिली तेथे पोहचतात.)

मैथिलीः- नमस्कार सर मी मैथीली. मैथीली ईनामदार. आणि ही माझी फ्रेंण्ड निशिता पांडे!

निशिताः- नमस्कार!

मैथिलीः- अभिनेता आंट्या पांडेची पत्नी.

इन्स्पेक्टरः- अरे या या.... मँडम बसा... उगाच इथपर्यंत येण्याचा कशाला त्रास घेतला? एक फोन केला आसता तर कोणाला पाठवल असतं तिथं. आम्ही आंट्या पांडे सरांचे खुप मोठे फँन. त्यांची लाईक टिव्हीवरील सिरियल आम्ही सर्वजण बघतो. काय काम काढलं म्हणालात?

निशिताः- साहेब हे काल सकाळ पासनं घरुन काही न सांगता निघून गेले.  तर परत आलेच नाही.

इन्स्पेक्टरः- कुठे मित्रांकडे गेले असणार? नाही तर शुटींगसाठी गेले असणार.  येतील.

निशिताः- साहेब त्यांच्या मित्रालाही फोन लावलेत पण ते फोनच उचलत नाही. आणि लॉकडाऊनमुळे सर्वच शुटींग बंद आहेत त्यामुळे शुटींगचा प्रश्नच उरत नाही.

मैथिलीः- साहेब एका सुप्रसिध्द अभिनेत्याने अचानक घर सोडून निघून जाणे म्हणजे काळजी करण्या सारखच आहे. म्हणून आम्ही इथं तक्रार करण्यासाठी आलो.

इन्स्पेक्टरः- हो बरोबर आहे मॅडम तुमच. पण या आधी कोणाशी भांडण वैगेरे झालं होतं का त्यांच? किंवा काही धमकी वैगरे दिली होती का कोणी त्यांना?

निशिताः- नाही साहेब! तस काही नाही. पण काल आमच्या दोघांमध्येच थोडी बोलाबाली झाली. आणि त्याने मला संतापात ठोकळा मारुन फेकला सुदैवाने मी खाली वाकली आणि तो ठोकळा सरळ टि.व्हीवर जाऊन आदळला.

आणि टि.व्ही फुटला. आणि तो निघून गेला तर पुन्हा घरी आलाच नाही.

इन्स्पेक्टरः- कशावरुन झालं होत भांडण?

निशिताः- साहेब लाँकडाऊनमुळे सध्या सर्वच बंद असल्याने शुटींगही बंद आहेत. अशातच घरात जरा पैशांची चणचण भासत होती. यांवरुन थोडी कुरबुर झाली घरात. पण यां आधीही आमच्यात बऱ्याचदा छोटेमोठी भांडण होत होती आमच्यात. पण असा कधी तो घर सोडून गेला नाही.

इन्स्पेक्टरः- सर्व ठिक होईल. लाँकडाऊन थोडी कायम राहणार. आपणा सर्वांनी संयम बाळगला तर हेही दिवस जातील निघून. आणि सर्वांना या घातक विषाणूपासूनही वाचता येईल. तुम्ही काळजी करु नका! आम्ही शोधतो त्यांना.

निशिताः- थँक्यु सर....

इन्स्पेक्टरः- तुम्ही म्हणताय; या आधी आंट्यासाहेब कधी घर सोडून गेले नाही. त मग यांमागे कुणाचा हात आहे? हेही शोधनं तितकचं महत्वाच आहे. कोणी धमकी दिली

असेल सरांना तर तेही सांगा. म्हणजे दोघ बाजूने तपास करता येईल.

निशिताः- एकदा खंडणीसाठी एकाने आंट्याला धमकी दिली होती. पण आम्ही एवढं काही मनावर घेतलं नाही.

इन्स्पेक्टरः- कोण होता तो?

निशिताः- डब्बा डॉन बोलतोय.... अस सांगत होता. ज्या नंबरवरुन कॉल होता तो नंबर आहे सर माझ्याकडे.

इन्स्पेक्टरः- द्या बघू तो नंबर.... त्या डब्ब्याचा नाय डब्बा वाजवला तर नावाचा लोखंडे नाय.

निशिताः- घ्या साहेब त्याचा नंबर!

इन्स्पेक्टरः- बोला.

निशिताः- 7030..... (निशिता नंबर सांगते.)

इन्स्पेक्टरः- माने हा नंबर घ्या आणि ट्रेस करा. कुठून बोलतोय याचा तपास काढा. आणि ताब्यात घ्या त्याला. आणि यांची तक्रार नोंदवून घ्या.

हवालदार मानेः- जी साहेब. मॅंडम नांव काय साहेबांच पूर्ण?

निशिताः- आंट्या टी. पांडे....

हवालदारः- वय?

निशिताः- ३८ वर्ष

हवालदारः- व्यवसाय काय करतात आणि पुर्ण पत्ता?

निशिताः- बी विंग कृष्णकमल आपार्टमेंट मुंबई.

हवालदार २:- साहेब साहेब.... बाहेर मिडिया प्रतिनिधी आलेत. तुमच्याशी बोलायच म्हणताहेत.

इन्स्पेक्टरः- थांबवा त्यांना बाहेर आलोच आम्ही.

हवालदारः- (बाहेर जातो आणि माध्यमप्रतिनिधींना थांबायच सांगतो.)

(निशिता, मैथिली पोलिस स्टेशन बाहेर निघतात. तर मिडीया प्रतिनिधी त्यांना घेराव घालतात.)

मिडीया प्रतिनिधीः- मॅंडम आंट्या साहेब दोन दिवसांपासून घरी काहीही न सांगता निघून गेले हे खरयं?

प्रतिनीधी २ :- कुठं गेलेय काही सांगून गेले का?

निशिताः- होय खरयं. पण ते कुठ गेले हे काही त्यांनी आम्हाला सांगितल नाही.

प्रतिनिधीः- मग तुम्ही तक्रार नोंदवायला एक दिवस का उलटु दिला?

निशिताः- आम्ही रात्रभर ते येतील म्हणून त्यांची वाट बघितली. पण ते काही घरी  परतलेच नाही. म्हणून आज तक्रार दिली.

माध्यम प्रतिनिधीः- तुमच्यात आणि सरांमध्ये काही बाचाबाची झाली होती काय हे खरयं?

निशिताः- तसं आमच्यात काही झालेलं नाही. आणि झाल असलं तरी ते प्रत्येक  घरांत होतच असतं. या आधी मात्र ते कधीही घर सोडून गेले नाही. काल अचानक तो शामकांतकडे गेला पण नंतर परतलाच नाही.

मिडिया प्रतिनिधीः- कोण शामकांत?

निशिताः- लाईक टि.व्हीवरील सिरियलचे प्रोड्युसर.

माध्यम प्रतिनीधीः- सरांनी अचानक घरांतून निघून जाणं यांवर तुम्हाला काय वाटतयं?

निशिताः- भिती, भीती वाटतेय मला. कुठं गेले असणार ते?

माध्यमप्रतिनिधीः- लोखंडे साहेब मँडमांनी आता तुमच्याकडे तक्रार नोंदवली यांवर तुमच मत काय?

इन्स्पेक्टर लोखंडेः- आम्ही रितसर मँडमांचे जबाब नोंदवलेत. आम्ही तातडीने तपास यंत्रणा कामाला लावून सुप्रसिध्द अभिनेते आंट्या पांडेचा शोध घेऊ. मला खात्री आहे. ते लवकरच सापडतील.

माध्यम प्रतिनिधीः- धन्यवाद!

# सिन नं. १०

(टि.व्हीवर बातम्या सुरु आहेत.)

अँकरः- सुप्रसिध्द सिने अभिनेते आंट्या पांडे अचानक घरी काही न सांगता निघून गेलेय. यामुळे संपूर्ण चाहते वर्गांत एकच खळबळ उडाली आहे. आंट्या पांडे कौटूंबिक कलहामुळे कुठे निघून गेले? की यामागे कुणाचा हात आहे का? असा चौफेर तपास पोलिस यंत्रणा सध्या करीत आहे. याबाबत आताच आपण येथील स्थानिक पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक साहेबांशी चर्चा केली व त्यांनीही आंट्या पांडे यांचा लवकरच शोध घेतला जाईल. असा विश्वास व्यक्त केलाय.

कँमरामन निलेश बुरगडे सह मी विनू कंबरमोडे येताजाता न्युज मुंबई.

## सिन नं. ११

(एका चहा स्टाँलवर काही लोक चहा पिताय व आंट्या पांडेची बातमी ऐकून तेही हळहळ व्यक्त करतात.)

बंड्याः- लई दिलदार माणूस बघा. कुठं गेला असणार कुणास ठाऊक?

व्यक्ती १:- चांगला अभिनेता होता. असं जायला नको होतं.

व्यक्ती २ :- माणसाला प्रसिध्दी मिळाली की असच होतं. जीवाला धोकाच असतो. लई जपून वागावं लागतं बघा.

बंड्याः- देवा आपण आंट्या साहेबांचे लई मोठे फँन आहोत. त्यांच काही बरं वाईट नको होऊ देवू तुला प्रार्थना करतो.

व्यक्ती ३ :- आंट्या साहेबांना सुखरुप घरी येऊ देरे बाप्पा तुला विनंती करतो.

## सिन नं. १२

(हॉस्पिटलमध्ये एक व्यक्ती मृत झालाय.)

डॉक्टरः- Hi Is Deth

डॉक्टर २:- oh Shit..... खुप प्रयत्न केलेत सर याला वाचवायला. पण काही उपयोग झाला नाही.

डॉक्टरः- हो नं शेवटी दैव त्याच. या बॉडीला पॅक करा व जाऊद्या.

डॉक्टर २:- yes sir.

डॉक्टरः- या पेशंटचे कोणी नातेवाईक आलेत का?

डॉक्टर 2 :- नाही सर! दोन दिवसांपूर्वीच बेवारस म्हणून अॅडमिट केलं होतं. दोन दिवसांत कोणीही आल नाही त्याला बघायला.

डॉक्टरः- बर असो.... या बॉडीला लवकर हलवा.

डॉक्टर २:- जी सर.... कंपाऊंडर, शिस्टर अँब्युलन्स बोलवून फास्टली ही बॉडी घेऊन जा....

सिस्टरः- जी सर....

डॉक्टरः- तो पर्यंत रिपोर्ट तयार ठेवा.

डॉक्टर २:- Ok Sir.

(कंपाऊंडर मृत पेशंटची बॉडी प्लास्टीकमध्ये पॅक करतात आणि अँब्युलन्समध्ये टाकून वैकुंटधामकडे घेऊन जातात.)

सिस्टरः- सर.... सर.... या पेशंटच्या शर्टमध्ये हे ड्रायव्हिंग लायसन्स मिळालय.

डॉक्टर २:- काय नाव आहे वाचा बघू.

सिस्टरः- सर यावर तर आंट्या पांडे अस लिहीलय.

डॉक्टरः- आंट्या पांडे..... नांव तर ओळखीच वाटतयं.

डॉक्टर २:- सर म्हणजे ही बॉडी अभिनेता आंट्या पांडेची होती?

डॉक्टरः- अरे बापरे, हा तर लोचा झाला. आता मिडीयाला कसं तोंड देणार?
डॉक्टर दुबे पोलिस स्टेशनला ताबडतोब कळवा. आणि लगेच त्यांच्या घरच्यांना बोलवून घ्या. आणि स्मशानभूमिकडे ती बॉडी नेणाऱ्यांना ताबडतोब तिथच थांबायला सांगा.

डॉक्टर २:- जी सर....!

## सिन नं. १३

(पोलिसांनी एका आरोपीला पकडून आणलय आणि ते त्याला विचारताय बोल आंट्या पांडे कुठयं? तितक्यात पोलिस स्टेशनचा फोन वाजतो.)

इन्स्पेक्टरः- बोल आंट्या पांडेला कुठ लपवलयं.

आरोपीः- नाही हो साहेब मला खरच काही माहीती नाही.

हवालदारः- डब्बा डाँन म्हणून दहशत माजवतो व्हय.

इन्स्पेक्टरः- आणि खंडणी मागतो.

आरोपीः- नाही हो साहेब! म्या गरीब माणूस. म्या तर फक्त मस्करी केली होती.

इन्स्पेक्टरः- हवलदार आंट्या पांडे सापडत नाही. तो पर्यंत याला सोडू नका.

हवालदारः- जी साहेब!

इन्स्पेक्टरः- आणि हा कुठं काम करतो? याचा तपास काढा.

हवालदार २:- साहेब हा फळ विक्री करतो. तिथच पकडला याला. या नंबरवर काँल करुन लोकेशन घेतले.

इन्स्पेक्टरः- गुड.... आता आणखी कोर्टाकडून रिमांड मागा याचं आणि कबलवा याला.

हवालदारः- जी सर!
(तितक्यात फोन वाजतो.)

हवालदारः- हँलो पोलिस स्टेशन.

डाँक्टर २ :- साहेब मी हाँस्पिटल मधून बोलतोय. आंट्या पांडे यांची डेथ झालीय. त्यांचे सर्व रिपोर्ट पाँझिटीव्ह आले होते. (in Phone)

हवालदारः- बर बाँडी कुठय आता?

डॉक्टर २ :- ती नेली गेली वैकुंठ धामला. (in Phone)

हवालदारः- बरं आम्ही पोहचतोच तिथं. आम्ही येईपर्यंत अंत्यसंस्कार करु नका बॉडीचे.

डॉक्टर २ :- ok आम्ही पण आहोतच हॉस्पिटलला तुम्ही या इकडे. (in Phone.)

हवालदारः- साहेब, साहेब हॉस्पिटल मधून फोन होता. आंट्या पांडेची डेथ झालीय त्यांचे सर्व रिपोर्ट कोरोना पॉझिटीव्ह होते.

इन्स्पेक्टरः- काय सांगता? शिंदे गाडी काढा लवकर. आणि श्रीखंडे आंट्याच्या घरी कळवा लवकर.

हवालदारः- होय साहेब. करतो लगेच फोन.

(हवालदार फोन करतो.)

हॅलो निशिता पांडे बोलताय का?

निशिताः- होय बोलतेय! आपण? (in phone)

हवालदारः- मी पोलिस स्टेशन मधून श्रीखंडे बोलतोय. दोन दिवसांपूर्वीच नाही का तुम्ही तक्रार नोंदवायला आले होते.

निशिताः- हो हो आले होते. लागला का काही तपास यांचा? (in phone)

हवालदारः- मॅंडम स्वारी.... सांगतांना खुप दुखः होतयं. आंट्या साहेब या जगांत नाही राहीले. आताच हॉंस्पिटल मधून तसा फोन आला होता. कोरोना असल्याचा संशय डॉंक्टरांनी व्यक्त केलाय. तुम्ही लवकर हॉंस्पिटलला पोहचा.

निशिताः- जी साहेब येतोच आम्ही. (in Phone)

## सिन नं. १४

(हाँस्पिटलमध्ये गर्दी झालीय. मिडिया प्रतिनिधीही त्या ठिकाणी आले आहेत तितक्यात निशिता आणि मैथीली व दोन जण तेथे येतात.)

इन्स्पेक्टरः- डाँक्टर बाँडी कुठयं?

डाँक्टरः- सर बाँडी सुरक्षेच्या दृष्टीने लवकर हलवावी लागली.

इन्स्पेक्टरः- रिपोर्ट कुठेय.

डाँक्टर २:- साहेब हे बघा रिपोर्ट सर्व पाँझिटिव्ह आलेय.

इन्स्पेक्टरः- कसं कळलं तुम्हाला? की हे पेशंट आंट्या पांडेच होतं.

डाँक्टरः- साहेब आम्हाला नंतर कळलं. पेशंटच्या या शर्टात ड्रायव्हिंग लायसन्स होतं. त्यावरुन ओळख पटली.

इन्स्पेक्टरः- दोन दिवसांपुर्वीच ते घरुन निघून गेले होते. तशी तक्रार त्यांच्या पत्नीने दिलेली होती.

हवालदारः- साहेब आंट्या पांडेंची पत्नी आलीय.
इन्स्पेक्टरः- पाठवा आत त्यांना.

हवालदारः- मँडम तुम्हाला आत बोलवल साहेबांनी.
(नाशिता आत जाते.)

नाशिताः- आंट्या...., का सोडून गेलास आम्हाला? आता कस होणार आमचं?
(निशिता रडतेय सर्वजण तिची समजूत काढताहेत.)
सिस्टरः- मँडम शांत व्हा.... जे झाल ते झालं.

डाँक्टरः- मँडम आता तुम्हीच या लेकरांचा आधार आहात. ते आपल्या हातात नसतं. आधीच कळल असत ते आंट्या पांडे आहेत तर आपण साहेबांना दुसरीकडे हलवल असतं. आणि त्यांचे प्राण वाचवले असते.
ईन्स्पेक्टरः- मँडम धीर धरा.... हे रिपोर्ट यांवर सही करा.
(मैथीली निशिताच्या खांद्यावर हात ठेवत. सही करण्यास नजरेने खुणावते. आणि निशिता रिपोर्टवर सही करते.)
डाँक्टरः- मँडम हे डेथ सर्टीफिकेट घ्या आंट्या साहेबांच.

मैथलीः- निशिता चला निघूया. चला डाँक्टरसाहेब.

डाँक्टरः- हो चला.

(सर्वजण स्मशानभूमीकडे जातात. तिथ दूरुनच बाँडीच अंत्यदर्शन घेऊन नंतर मृतदेहाचे अंत्यसंस्कार केले जातात.)

निशिताः- साहेब मला त्यांच शेवटच दर्शन घेऊद्याहो. त्यांच तोंड तरी बघू द्या.

डाँक्टरः- मँडम स्वारी. आधीच साहेबांचे सर्व रिपोर्ट पाँझिटीव्ह आलेत आणि त्यांना कोरोना होता. हे देखिल सिध्द झालय. त्यामुळे डेड बाँडी उघडून बघता येणार नाही.

(निशिता रडते तिचे मुलही रडतात. आणि डेथबाँडीवर अंत्यसंस्कार केले जातात.)

इन्स्पेक्टरः- मँडम सावरा आता स्वतःला. आम्ही निघतो. काही गरज पडल्यास काँल करा आम्हाला.

(निशिता सर्टीफिकेट घेऊन घराकडे जातात. व इन्स्पेक्टरही पोलिस स्टेशनकडे रवाना होतात.)

## सिन नं. १५

(टि. व्हीवर बातम्या चालू आहेत. आणि लोक ऐकताय.)

अँकरः- सुप्रसिध्द अभिनेता आंट्या पांडे यांचे कोरोनामुळे निधन. काही दिवसांपुर्वीच आंट्या पांडे घरातून काही न सांगता निघून गेले होते. परंतु त्यांच्यावर कोरोना सदृश गंभीर आजाराने घाला घालून त्यांचा मृत्यु झाल्याचे निदानात समोर आले. त्यांच्या जाकीटच्या खिशात सापडलेल्या ड्रायव्हींग लायसन्समुळे त्यांची ओळख पटली असून त्यांच्यावर जवळच्या स्मशानभूमित मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवसेंदिवस कोरोनाचा कहर वाढतच असून नागरीकांनी अफवांवर विश्वास नठेवता मास्क, सँनिटायझरचा वापर करुन कोरोना सारख्या गंभीर विषाणू पासून सुरक्षित रहावे अस प्रशासनाकडून अवाहनही करण्यात येतय.

बंड्याः- देवा चांगला अभिनेता गेला रे.... (चहावाला)

व्यक्तीः- होय खरच चांगला होता रे तो नट.

व्यक्ती २:- त्यांचा अभिनय कधीही कोणी विसरु शकणार नाही.

बंड्याः- आंट्या साहेब आमर रहे.

सर्वजणः- आंट्या साहेब अमर रहे.....

## सिन नं. १६

(पोलिस स्टेशन मध्ये)

इन्स्पेक्टरः- हवालदार त्या आरोपीला सोडून द्या. आंट्या पांडेचा मृत्यु आजारानेच झालाय.

हवालदारः- जी साहेब सोडतो त्याला. चल रे जा आता साहेबांनी तुला सोडून द्यायला सांगितल.

आरोपीः- लई उपकार झालेत साहेब. मी सांगत होतोना मी नाही आंट्या साहेबांच अपहरण केल म्हणून. पण तुम्ही काय ऐकतच नव्हता साहेब.

हवालदारः- बर तू जाऊ शकतोस आता. पण यांपुढे असा खोडसाळ पणा करु नकोस आणि कोणाकडून खंडणी मागू नकोस.

आरोपीः- मी अशी चूक कधीही करणार नाही साहेब. जातो मी.

## सिन नं. १७

(आंट्या पांडेच्या घरी त्याच्या कार्यक्रमासाठी लोक जमलेत समोर आंट्याचा फोटो ठेवलेला असतो. तितक्यात आंट्या घरी येतो बघतो तर काय समोर शोकसभा सुरु असते आणि लोक त्यालाच श्रध्दांजली वाहत असतात तो ते चित्र गुपचूप आडोशाने बघतो व हिच संधी साध तो तेथून निघून जातो. थोड्यावेळाने तेथे जमलेले लोकही निघून जातात. निशिता आणि आंट्याची दोन्ही मुलं एकटेच रडत बसतात.)

मैथीलीः- निशिता काळजी घे आता. जे झालं ते झालं सावर आता स्वतःला. चल येते मी.

धवलः- हो वहिनी तुम्ही काळजी घ्या आणि तब्येती सांभाळा. काही अडलं तर मला फोन करा.

(निशिताला रडू कोसळतं. धवल आणि मैथीलीही निघून जातात.)

## सिन नं. १८

(सकाळची वेळ निशिता घरात बसलीय. तितक्यात दाराची बेल वाजते. निशिता दार उघडते. डायरेक्टर शशिकांत तेथे येतात आणि आंट्याला दिलेले अँडव्हान्सचे पैसे परत मागतात.)

शशिकांतः- निशिता जे झालं ते झालं. आता रडून काय फायदा? प्रसिध्दीच्या उंच शिखरावर चढलेल्या आंट्याला नियतीने अचानक हिरावून नेणं हे खरोखरच हृदय पिटवून टाकणारी गोष्ट पण आता जे झाल ते झालं. वास्तव तर स्विकारावच लागणार निशिता वास्तव तर स्विकारावच लागणार.

निशिताः- रडते.....

शशिकांतः- आता रडून काहीबी उपयोग नाय आंट्या गेला गेला. टि.व्हिवर बघितलं मी तेंव्हा कळलं. आता थोडीना तो परत येणार आहे. मी काय म्हणतो. ते त्याने घेतलेले अँडव्हान्सचे पैसे कधी परत करणार मँडम आता?

निशिताः- लाँकडाऊन संपल्यावर करते प्रयत्न तुमचे पैसे परत करायचे.

शशिकांतः- प्रयत्न नको. डायरेक्ट सर्व पैसे पाहिजेत मला. नाही परत केले तर तुलाच उचलून नेईल ध्यानात ठेव.

निशिताः- शशिकांत तोंड सांभाळून बोला. तुमचे पैसे मिळतील तुम्हाला दोन महिन्याने. आणि माझ्याशी अस अभद्र बोललात तर याद राखा.

शशिकांतः- नाही दिलेत तर बघतोच. चला रे.

(शशिकांत निघून जातो तर निशिता रडत बसते.)

## सिन नं. १९

(दूपारचे १२ वाजलेत. निशिता घरात बसालीय. तितक्यात तिची मोलकरीन येते.)

निशिताः- कोण वंदू ये अगं पण आज पासून तू आमच्या इथलं काम बंद करायच. हे घे तुझे पैसे.

वंदूबाईः- पण मँडम का?

निशिताः- अगं आता साहेब पण नाहीत आणि त्यात लाँकडाऊन! मग तुझा पगार कसा देवू शकेन मी?

वंदूः- मँडम पैसा आज नाही तर उद्या भेटेन! म्या काय आत्ताच मागतीय व्हय तुमच्याकडे.

निशिताः- नाय नाय तस नाही. पण इन्कमच बंद झाला तर तुझे पैसे नाही दिले जाणार माझ्याकडून. म्हणून तू आमच्या इथल घरकाम बंदच कर.

वंदूबाईः- जी मँडम बघा जशी तुमची ईच्छा. चला येते मी.

(वंदू निशिताने दिलेले तिच्या पगाराचे पैसे घेऊन निघते. तितक्यात निशिता तिला पुन्हा आवाज मारते.)

निशिताः- वंदू ये वंदू....

वंदूबाईः- काय मँडम?

निशिताः- वंदू प्लीज माझ एक काम कर.

वंदूः- बोला मँडम काय काम ते?

निशिताः- वंदू साहेब गेल्यापासून घरात पैशाची लई अडचण आहे. त्यात हे लाँकडाऊन आणि मुलांचा खर्चही पेलवत नाही. म्हणून मी काय म्हणते.

वंदूबाईः- मँडम बोला ना.... काय ते तर? मला दूसरीकडे कामावर जायला उशिर होतोय.

निशिताः- वंदू एखादी घरी तुझ्यासारख मलाही काम मिळाल तर बघ तेवढं, बर होईल.

वंदूः- (आश्चर्य चकीत होऊन) बाई काय मजाक लावलीसा मजाक घेता व्हय माझी गरीब बाईची. तुम्ही अन हे असल माझ्या सारख मोलकरीन म्हणून कस काम करणार? तुम्ही तर मालकीण आहात मालकीण.

निशिताः- वंदू मालकीण होते. पण आता नाही. ऐक माझ तेवढ काम मिळाल तर घरखर्चाला हातभार लागेल. मी तुझ्या पाया पडते. पण ही गोष्ट फक्त आपल्या दोघांमध्ये ठेवायची.

वंदूबाईः- जी मँडम.... तुम्ही म्हाणताय म्हणून बघते म्या तुमच्यासाठी माझ्या सारख काम.

निशिताः- हम्म बर होईल.

वंदूः- पण मँडम तुम्हाला कोणी हे असलं मोलकरीन म्हणून काम करतांना बघितल किंवा समजा इतक्या प्रख्यात नटाची बायको आहे हे ओळखल तर?

निशिताः- तु त्याची काळजी करु नकोस.

वंदूबाईः- बरं तर मग मलाही एका ठिकाणी सांगितलय बाई पाहिजे म्हणून. जर तुम्ही आता माझ्या सोबत येत असाल? तर लगेच बोलण करुन घेऊयात का?

निशिताः- बरं ठिक आहे. थांब मी आलेच. (निशिता आत जाते आणि जूनीसाडी नेसून मोलकरीन लूकमध्ये तयार होवून येते.)

निशिताः- समर, दिव्यांशा मी येई पर्यंत कितीही दाराची बेल वाजली तरी खिडकीत डोकावू नका. मी आलेच.

समरः- पण मम्मी तू कुठ जातेय? आम्हाला सोडून.

दिव्यांशाः- मम्मी आम्हीपण येतो तुझ्या सोबत.

निशिताः- दिव्यांशा समीर तुम्ही घरातच खेळा. मी आता येते.
वंदूः- बाई चला पटकन उशीर होतोय.

निशिताः- आले आले.
(निशिता आंट्याच्या फोटो समोर उभी राहून सांगते.)

निशिताः- अहो तुम्ही गेल्यापासून आमची नुसातीच फरपट होतेय. त्यात ज्यांचे पैसे घेतलेत ते तगदा लावताय. आता माझ्याकडेही कुठला पर्याय नाही. आणि तुमची ईच्छा होतीना मी मोलकरीन म्हणून काम कराव. बघा तीही पूर्ण करतेय मला माफ करा. आंट्या मला माफ करा.

वंदूः- बाई चला पटकन उशीर होतोय.

(निशिता डोळे पुसत बाहेर येते. वंदू निशिताला मोलकरणीच्या लूकमध्ये बघून अवाक होते.)

वंदूः- बाई हे काय? तुम्ही तर माझ्यापेक्षाही अस्सल मोलकरीन वाटताय. पण हे समद कशासाठी केलय?

निशिताः- वंदू अग मी तशी गेली तर मला कोण काम देणार? म्हणून हा गेटअप केलाय.

वंदूः- अच्छा अच्छा आत्ता कळल बघा. बर चला पटकन! कोणी बघेल नाहीतर.

निशिताः- थांब मी दार लॉँक करते. मग निघूयात आपण.

(निशिता दाराला कुलूप लावते आणि निघते.)

## सिन नं. २०

(वंदू निशिताला घेऊन एका घरी कामासाठी जाते. वंदू आणि निशिता त्या घरी पोहचतात. वंदू दाराची बेल वाजवते. एक बाई दार उघडते. )

एकबाईः- कोण? अगं वंदू तू येये....

वंदूः- बाई तुम्ही मला सांगितल व्हतसा तुमच्याघरी कामाला बाई पाहिजे म्हणून. म्हणून आलो आम्ही.

एकबाईः- बर झालं आलेत. माझ्या कडून आता नाय व्हत वयमानान काम म्हणून. पण ही करेल ना व्यवस्थीत काम?

वंदूः- हो बाई करेल ती नीट काम समद.

एकबाईः- पण ही तुझ्या ओळखीतली आहे ना? कारण आजकाल फसवणूकीचे प्रमाण वाढलय. म्हणून म्हटल. उगाच अनोळखी व्यक्तीला काम देवून जोखीम नको.

वंदूः- बाई तुम्ही काहीबी काळजी करु नका. लई इमानदार हाय ती. आणि माझी चुलत बहिणच आहे.

(निशिता वंदूकडे बघते. वंदू डोळ्यानेच इशारा करत निशिताला दिलासा देते.)

एकबाईः- बर ठिक आहे. तीन हजार रुपये मिळतील महिन्याला. काम आवडल तर वाढवू पुढे पगार.

वंदूः- बाई निदान चार हजार तरी द्या. लेकरबाळ हाय तिचे पण.

एकबाईः- अगं मी सांगितल ना.... काम चांगल केल, तर मीच चार सोडून पाच हजार देईल म्हणून.

निशिताः- बर ठीक आहे ताई! मग कधीपासून येवू म्या तुमच्याकड कामाला?

एकबाईः- अग कधी पासून काय विचारतेस? आज आतापासूनच लाग तू चालेल आम्हाला. अशीही घरात कामाला कोणी नाही.

निशिताः- बरं ठिक आहे बाईसाहेब.

वंदूः- मँडम.... तुम्ही लागा मग कामाला.

एकबाईः- कोण मँडम? मी समजले नाही.

वंदूः- स्वारी स्वारी स्वारी.... चूकून हिला मँडम बोलली. आम्ही बालपणी हिला समदे मँडम म्हणूनच चिडवियचो ना म्हणून तेच तोंडात आलं बघा.

एकबाईः- अस व्हय? छान! बर हिच नांव काय म्हाटलीस?

वंदूः- बाई ही सपनाबाई आणि आमच्या घरला राहतेय सध्यातर.

एकबाईः- बरं. सपनाबाई आधी स्वयंपाक करुन घे घरात आणि मग भांडी आणि धुणं पडलय ते धूवून घेशिल. आणि हो दररोज सकाळी लवकर येत जाशिल.

निशिताः- हो बाई चालेल! म्या लवकर येत जाईल.

वंदूः- सपना चल येते म्या. मला पण उशिर होतोय. म्या बाजूच्याच बिल्डिंगमध्ये हाय काही अडल तर आवाज देशिल मला.

निशिताः- हो वांदूताई.

एकबाईः- चल सपनाबाई स्वयंपाक करायचा बाकी आहे. आपला पण.

## सिन नं. २१

(निशिता संध्याकाळी घरी येते. मुलांसाठी मालकीनीने दिलेला खाऊ आणते.)

समरः- हे मम्मी आली.

दिव्यांशाः- मम्मी पण आम्हाला सोडून कुठ गेली होतीस?

निशिताः- अगं थोड शुट होत ना. म्हणून गेली होती मी बाहेर.

समरः- म्हणजे तु आता रोज शुटींगला जाणार ?

निशिताः- हो रे राजा! आता तुझे पप्पा नाहीत म्हणून घरची जबाबदारी मलाच पार पाडावी लागणार. म्हणून तुझ्या पप्पांसारख मलाही सिरियलच्या शीटींगला जाव लागेल. तेंव्हाच आपल्याला जेवण मिळत जाईल.

चला मी तयार होऊन येते. मग आपण जेवण करुन घेऊयात.

समरः- हो मम्मी मला पण भूक लागलीय.

दिव्यांशाः- हो मम्मी मला पण खूप भुक लागली आहे.

(निशिता तयार होऊन येते. आणि तिघेजण जेवण करतात नंतर झोपतात.)

## सिन नं. २२

(निशिता दररोज सकाळी कामाला जाते. कामाच्या ठिकाणी घराची साफसफाई, स्वयंपाक, भांडी धूणे कपडे धूणे असे कामे करते.)

## सिन नं. २३

(निशिताला फोन येतात.)

शशिकांतः- हँलो निशिता मँडम झाला का पैशाचा बंदोबस्त?

निशिताः- हो करतेय सर मी प्रयत्न. आले तर थोडे थोडे देईल परत मी तुम्हाला.

शशिकांतः- थोडे थोडे म्हणजे? त्या काय कवड्या आहेत का? थोडे थोडे म्हणे. समदे एकाचवेळी दे! नाही तर तुला आँफर आहे माझ्याकडे दोनवेळा यायच. म्हणजे पैसे परत करायच टेंशनच नाही.

निशिताः- तोंड सांभाळ शशिकांत.

शशिकांतः- मी तोंड सांभाळलच आहे. तु तुला सांभाळ (शशिकांत हसत बोलतो व फोन कट करतो.)

(निशिता टेंशनमध्ये तितक्यात फोन वाजतो.)

समोरील व्यक्तीः- हँलो आंट्या पांडेच्या पत्नी का?

निशिताः- हो बोलतेय.

समोरील व्यक्तीः- मी प्रोड्युसर बी. कुमार बोलतोय. ते आंट्याने दहा लाख रुपये घेऊन सिनेमा साईन केला होता. तर आता ते कधी परत करणार म्हटल?

निशिताः- हे बघा सर माझ्याकडे पैसे आले तर मी देईन तुमचे समळे पैसे.

समोरील व्यक्तीः- हे बघा पुरे झाले तुमचे बहाणे. दोन दिवसांत नाही पैसे मिळाले तर मी घरातला सगळा सामान भरुन नेईन.

निशिताः- अहो प्लीज ऐका माझ. मी तुमचे सगळे पैसे परत करेल. अहो सर ऐका माझ.

(फोन कट होतो.)

## सिन नं. २४

(निशिता आंट्याचा मित्र धवल आणि तीची मैत्रीण मैथीलीला फोन करते. रिंग वाजते पण धवल कॉंल उचलतच नाही.)

निशिताः- धवल भावजी उचला प्लीज फोन. मी खुप अडचणीत आहे. शिट हे धवल भावजी काही फोन उचलत नाही. चला मैथीलीलाच लावून बघते ती तरी यांवर उपाय सांगेल.

निशिताः- हँलो मैथीली अ गं मी निशिता बोलतेय.

मैथीलीः- बोल निशे काय काम आहे?

निशिताः- अ गं मैथीली ऐकना... आंट्याने काही डायरेक्टर आणि प्रोड्युसरांकडून अँडव्हान्स पैसे घेतलेय. ते परत मागताय पैसे! ते ना सारखे फोन करताहेत.

मैथीलीः- बर मग. (in phone)

निशिताः- अग नाही दिले तर घरातल्या सर्व वस्तू घेऊन जायची भाषा करताय. काय करु? मला काहीच कळत नाहीये.

सिन नं. २४ अ (on frame)

मैथीलीः- बर मग मी काय करु त्याला तो तुमचा प्रश्न आहे. आणि आता यांपुढे हे असले प्रॉँब्लेम सांगायला मला सारखे सारखे फोन करत जावू नकोस. भिकारडी मेली.

(मैथीली फोन कट करते.)

सिन नं. २४ ब (on Frame)

(इकडे निशिताला खुप वाईट वाटते. ती रडते.)

निशिताः- सुखात सर्वच सोबत असतात. पण अडचणीत कोणीच कोणाची मदत करीत नाही. कोणीच कोणाची मदत करत नाही. देवा आता काय करु तुम्हीच सांगा मला, तुम्हीच सांगा. मी यांतून कसा? मार्ग काढू तर.

## सिन नं. २५

काही दिवसां नंतर …

एकबाई (मालकीन) :- सपनाबाई आज १० तारीख. हा घे तुझा पगार! लई इमानदारीन काम करतेस पोरी. म्हणून हे पाचशे रुपये तुला शिवाय देतेय.

निशिताः- धन्यवाद बाई.

मालकीनः- सकाळी लवकर येत जा. नेहमी सारखं.

निशिताः- बर बाई साहेब.

## सिन नं. २६ अ

(अपार्टमेंट जवळ काही बायका आपसात बोलत असतात त्यांच लक्ष समोरुन येणाऱ्या निशिताकडे जात. आणि त्या तिच्या बद्दल बोलतात.)

वैद्येही:- अग रेवती ती बघ समोरुन येतेय ती आपल्याच सोसायटीत राहते ती आंट्या पांडेची पत्नी दिसतेय.

रेवती:- अग ती कुठे आणि ही कुठे? ही तर एखादी मोलकरीन दिसतेय.

मालती:- अग हो ही तर तीच आहे. काय करणार बिचारी? नवरा गेल्यापासून बघ काय अवस्था झाली तिची. पैसा असला तर खुप माजतात. आणि नवरा गेल्यापासून बघ कशी भिकारीन दिसतेय.

(तिघ हसतात. तितक्यात निशिता त्यांच्या जवळून जाते.)

मालती:- ओ निशिता मॅंडम.... नवरा गेल्या पासनं काय अवतार करुन घेतला बघा तुम्ही. साहेब चांगले होते तेंव्हा तुमची हवा होती. आणि ही असली फाटकी साडी नेसून मघाशी कुठ जाताय तुम्ही रोज?

निशिताः- (अडखळत बोलते.) अ.. ह.. ते ना.. ते मी एका सिरियलच्या शुटींगला जातेय म्हणून तो गेटअप केलाय मी.

वैदेहीः- मँडम सिरियलच्या शुटींगला जाताय मग कार का नाही घेऊन जात?

निशिताः- ते काय ना; कार खराब झालीय आमची. म्हणून आँटोनेच ये जा करते रोज. चला येते मी.

मालतीः- हो या हं मँडम. तुमच्या सारखे महान लोक आमच्या सोसायटीत राहताय हे आमच भाग्यच म्हणावं.

(निशिता तेथून निघते.)

रेवतीः- मँडम शुटींगला जातात की मोलकरीन म्हणून कामाला देव जाणे.

(तिघी हसतात. निशिता त्यांच बोलणं ऐकून मनाने दूःखी होते.)

## सिन नं. २६ ब

(निशिता घरी येते. दार उघडते. बघते तर काय? दाराजवळ एक पाकीट पडलेल असतं. निशिता ते उघडून बघते. तर आत दहा हजार रुपये ठेवलेले असतात.)

निशिताः- हे पाकीट कुठून आलय इथं? कोणी ठेवल असेल? बघू तर खरी यांत काय आहे ते? बापरे यात तर पैसे आहेत पैसे.... कोणी ठेवले देवजाणे. पण देवालाही आमची कनव आली म्हणाव. बर झाल देवा यांत किराणा आणि रुमभाडे तरी दिल जाईल. (निशिता मनोमनी आनंदी होते.)

## सिन नं. २७

(सकाळची वेळ वंदू निशिताला कामाला जाण्यासाठी बोलवायला येते. दोघ जण घरकामाला जतात.)

वंदूः- बाईसाहेब चला की पटकन उशीर होतोय.

(निशिता मोलकरनीसारखा लूक करुन तयार होते.)

निशिताः- आले आले....

समर दिव्यांशा आज दिवाळी आहे. मी दूपारी लवकर घरी येईल आणि तुमच्यासाठी छानपैकी नवाड्रेस आणि खाऊ पण आणेन.

समर दिव्यांशाः- हे.... (आनंदाने)

निशिताः- मी येई पर्यंत शांत बसायच, अजिबात मस्ती करायची नाही हा. चल येते मी मला उशीर होत आहे. शुटींगला जाण्यासाठी.

(निशिता दार बंद करते आणि वंदू आणि निशिता कामासाठी निघतात.)

वंदूः- बाई चला पटकन! आज सण हाय आणि दूपारला जरा मार्केट जावू म्हणते येतांना.

निशिताः- हो मला पण बाजार करायचाय आणि मार्केटला जावून मुलांसाठी नविन ड्रेस घेऊ म्हणते.

## सिन नं. २८

वंदूः- चला बाई तुम्ही आटोपा तुमची काम! मी येतेच दूपारी तुमच्या इथ. मग जावू आपण बाजारात.

निशिताः- हो हो. ये तू वंदू.

(निशिता घरकामासाठी पोहचलेली असते.)

मालकीनः- सपनाबाई आधी घर पूसून घे आणि भांडी धूवून टाक.... म्हणजे दूपारी तुला लवकर जाता येईल. आज सण आहे ना.

निशिताः- हो बाई साहेब.

(निशिता घर पुसते, कपडे धूते, भांडी घासते. व संपूर्ण काम आटोपल्यांवर मालकिनीला बोलते.)

निशिताः- बाई झाल समद काम, निघू म्या आता?

मालकीनः- बरं बरं.... अग सपना थांब. ही दिवाळी निमित्त मिठाई आणलीय तुझ्यासाठी तेवढी घेऊन जा. मी काल तुला द्यायलाच विसरले.

निशिताः- अहो असूद्या बाई साहेब. याची काय गरज? दिलच पाहिजे व्हय ते?

मालकीनः- अग रिवाज तो, त्यात काय बिघडल? तू इतक्या इमानदारीन काम करतेस मग माझ कर्तव्य नाही का ते? घे घेवून जा! अशी नाही म्हणू नकोस.

(तितक्यात वंदू आवाज देते.)

वंदूः- सपना ताई ओ सपनाताई चला पटकन. मार्केट बंद व्हायच नाहीतर.

निशिताः- चला बाई येते म्या.

मालकीनः- हो ये हा सपना.... आणि काळजी घे.

निशिताः- हो बाईसाहेब.

(निशिता निघते.)

वंदूः- बाई साहेब चला पटकन. उशीर होतोय, आधीच उशिर झाला आहे. आणि दोन वाजता मार्केट बंद होईल.

निशिताः- हो चल चल.

वंदूः- रिक्षा... (वंदू रिक्षावाल्याला थांबवते.)

रिक्षावालाः- कुठ जाताय?

वंदूः- जीएमसी. रोड किती घ्याल?

रिक्षावालाः- बाई बसा पटकन! पोलिस यायचे नाहीतर.

(रिक्षा थांबते आणि निशिता व वंदू मार्केटला जातात.)

## सिन नं. २९

(दोघ मार्केटला पोहचतात आणि रिक्षावाल्याला पैसे देतात.)

वंदूः- किती झाले?

रिक्षावालाः- बाई द्या पटकन! चाळीस रुपये झाले.

वंदूः- बाई बाई बाई... आधीच ह्या कोरोनान समद्यांची कंबरड मोडलय आणि आता हे पण लूटायला निघालेत.

रिक्षावालाः- ओ बाई आधीच आम्हाला परवानगी नाही. पण आणल तुम्हाला.

वंदूः- हे घे वीस रुपये.

रिक्षावालाः- बाई ही काय मजाक लावली? अजून वीस रुपये द्या... पोलिस आले तर ते रिक्षापण आणि मला पण जमा करतील.

निशिताः- जावू दे गं वंदू बिचाऱ्याला. त्यांचे पण धंदे ठप्प झालेत या कोरोनामुळे. हे घ्या दादा अजून वीस रुपये.

(रिक्षावाला पैसे घेतो आणि तेथून निघतो.)

वंदूः- काय बाई तूम्ही पण, वीस रुपये बरोबर होते. हे लोक लुटायला निघालेत आता.

निशिताः- चल पटकन दोन वाजायला आलेत. मार्केट बंद व्हायच नाहीतर.

(दोघ मार्केटमध्ये निघतात मात्र सर्व दूकाने बंद असतात.)

वंदूः- बाई इतकी धरपड करुन काहीबी उपयोग झाला नाही बघा. समद मार्केट बंद झाल.

निशिताः- हो न. आता मुलांना सांगितल तर खरे नविन ड्रेस आणिन. पण आता काय सांगू त्यांना? मलाच कळत नाही.

वंदूः- बाई उद्या बघू मार्केटला येऊन. चला, थोडा भाजीपाला तरी घेऊन जावू घरला आलोच आहे तर. चांगला टवटवीत दिसतोय भाजीपाला.

निशिताः- हो चल बर झाल आठवण दिली.

(रस्त्याने भाजी विक्रेत्यांची दूकाने आहेत व ते चला भाजी आलू, कांदे, मेथी शोपालक वांगी, गवार असा आवाज देत आहेत.)

वंदूः- बाई ते बघा तो गाडीवाला येतांना दिसतोय. त्याच्याकडे चांगली ताजी भाजी दिसतेय त्याच्याकडून घेऊयात.

निशिताः- हो चल चल.

वंदूः- ओ भैय्या भेंडी कैसे दी?

भाजीवालाः- बाई भेंडी पंधरा रुपये पाव. बिस की अधाकिलो.

वंदूः- भैय्या थोडा तो कम करो.

भाजीवालाः- ताई महेंगाई के जमानेमे नही पुरता हमरा. देणेको.

निशिताः- अग जाऊदे गं घेऊन टाक चागली दिसतेय भेंडी ताजी. भैय्या मुझे अधाकिलो दो.

वंदूः- मुझे भी अधा किलो....

(भाजीवाला भेंडी मोजून देतो. तर वंदूला तो भाजीवाला काहीसा ओळखीचा वाटतो. ती निशिताला गुपचूप सांगते.)

निशिताः- भैय्या ये लो पैसे.

वंदूः- बाई हा भाजीवाला तर मला आपल्या साहेबां सारखा दिसतोय.

निशिताः- अग गप मेलेला माणूस कुठ जीवंत होतो काय? असेल दूसरा कोणी.

वंदूः- बाई तुम्ही नीट बघा की. हे आपले साहेबच हाय.

भाजीवालाः- (वंदूला ओळखतो पण निशिताला ओळखू शकत नाही. कारण तीने मोलकरीनचा गेटअप केलेला असतो. वंदूला ओळखल्यामुळेच तो म्हणून तो निघायची घाई करतो.) बहेनजी दो पटकन पैसे... मुझे देर हो रही है.

निशिताः- नाही ग एक सारख्या चेहऱ्याची सात लोक असु शकतात या जागात? हा असेल त्या पैकी एक. ह्ह...

वंदूः- बाई नाही मला काही तरी लोचा वाटतोय. तुम्ही फकस्त साहेबांच नांव धरुन हाक मारा त्याला.

निशिताः- बर तु म्हणते म्हणून मारते हाक. आंट्या ओ आंट्या.

(निशिताचा आवाज ऐकून भाजीवाला मागे वळून बघतो.)

वंदूः- बाई बघितल तुम्ही, आंट्या म्हणून हाक मारली तर तो माग वळून बघतोय. म्हणजी हे आपलेच साहेब असावेत अस वाटतय मला.

निशिताः- (पुन्हा आवाज देते व त्याच्या गाडीला अडवते.) आंट्या थांब म्हणतेय ना तुला.

भाजीवालाः- ओ बाईसाहब कोण आंट्या? हा मै कोई आंट्या बांट्या नही हुँ... मै परकास हुँ परकास. यूपी से भाजी बेचने आया हुँ यहा बंबईमे हा... मुझे जाने दो.

(भाजीवाल्याला घाम फुटतो आणि घाम पुसता, पुसता त्याने मेकअपमध्ये लावलेला मस खाली पडतो. त्यावर वंदूच लक्ष जात.)

वंदूः- साहेब तुम्ही अँक्टींग भारी करतात. म्हणून तुम्ही मोठे नट झालेत.

पण तुम्ही कितीही खोट बोलले ना. पण खोटं कधी झाकल जात नसत हो. झाकल जात नसतं. ह्यो बघा तुमचा मसही गळून पडला खाली.

भाजीवालाः- नही नही. मेरा मस कैसे गिर सकता? ओ तो जनमसेही है हामरा मुँहपर. (आंट्या रुमालाने तोंड झाकत बोलतो.)

वंदूः- साहेब अहो हिला ओळखल का तुम्ही? ही बायको हाय तुमची बायको. एकेवेळी घरात मोलकरीन कामाला ठेवणारी बाई आज दुसऱ्याकडे मोलकरीन म्हणून काम करतेय. आणि तुमची लहान लहान मुलं घरात बंदीस्त बसलीय. तुम्ही हे जग सोडून गेल्याच दूखः अजूनही विसरली नाही ती बिचारी.

निशिताः- आंट्या अरे माझ्यासाठी नाही तर निदान त्या पोरांकडे तर बघ.

भाजीवालाः- निशिता तू? (आता आंट्याचा धीर सुटतो आणि त्याच्या तोंडातून आपसूक शब्द बाहेर पडतो.)

निशिताः- हो मीच! तुझ स्वप्न होतना, मी मोलकरीन म्हणून काम कराव? म्हणून करतेय मी हे सर्व झाल तुझ समाधान.

आंट्याः- निशिता मला माफ कर. तु म्हटली होतीस ना, मी भाजी विकावी. बघ विकतोय मी भाजी. एवढी प्रतिष्ठा पाण्यात मिसळून गेली माझी. प्रतिष्ठा पाण्यात मिसळून गेली. मला माफ कर निशिता मला माफ कर.

(आंट्या उदास स्वरात बोलतो.)

निशिताः- पण तू हे सारं का केलंस आंट्या? का खोटं बोललास तू? आणि ज्याचा आम्ही अंत्यविधी केला तो कोण होता मग?

आंट्याः- स्वारी मला माफ कर निशिता.

तो कोण होता हे मलाच ठाऊक नाही. पण मी अस का वागलो ऐकायचय तुला? ऐक तर मग. माझ्याकडे यांशिवाय दूसरा पर्यायच उरला नव्हता.

त्या दिवशी मी संतापात घरुन निघालो. तेथुन सरळ डायरेक्टर शशिकांतसरांकडे गेलो. मला थोडी पैशांची नड आहे म्हणून त्यांना पैशाची मागणी केली. पण त्यांनी मला काही पैसे दिलेच नाहीत. ते तेंव्हा दारु पित बसले होते.

त्यांनी मलाही आग्रह केला. पण मी त्यांना दारु पिण्यास नकार दिला. पण त्यांनी आग्रहच केला. म्हणून एक दोन पँग मारलेत. आणि मी तेथून निघालो. वाटेत एका निवांतस्थळी जावुन बसलो. दारुचा नशा इतका चढत होता की मला तेंव्हा काहीच उमगत नव्हत. अशातचमी माझ जाकीट तेथेच ठेवून निघून गेलो. जाकीटच्या खिशात माझा मोबाईल आणि ड्रायव्हिंग लायसन्सही होत.

बाजूलाच एक इसम थंडीने कुरकडत खुप खोकलत होता. मला त्यावर थोडा डाऊट आला. म्हणून मी तेथून निघून गेलो. मात्र माझ ते जाकीट मी तेथेच विसरलो. मग देव जाणे ते तेथून कोणी नेलं ते .

निशिताः- म्हणजे तु काय म्हणाला तु बसलेल्या ठिकाणावर कोणी इसम होता?

आंट्याः- हो.

निशिताः- कोण होता तो?

आंट्याः- आता मला काय ठाऊक. कोण? होता तो.

निशिताः- आणि तो खोकलतही होता?

आंट्याः- हो खोकलत होता. पण तू हे सारं का विचारतेस मला?

निशिताः- आंट्या म्हणजे त्या व्यवस्था व्यक्तीला कोरोना झालेला असावा. आणि तुझ जाकीट त्यानेच घातल असाव? आणि कोरोनानेच त्याचा मृत्युही झाला असावा?

आंट्याः- निशे अग पण याचा इथं काय संबंध?

निशिताः- अरे आंट्या आंट्या.... तो जो इसम वारला. त्याने कदाचित तुझ जाकेट नेल असेल. आणि तुझ ड्रायव्हिंग लायसन्स वरुन डॉंक्टरांना वाटल असाव? की हा आंट्या पांडेच आहे. म्हणून त्यांनी आम्हाला कळवल असेल

कदाचित. आणि आम्ही ज्या व्यक्तीचे अंत्यसंस्कार केलेत. तो ही तोच व्यक्ती असेल.

आंट्याः- काय सांगतेस निशे? अग मग तुम्ही त्याचा चेहरा नाही बघितला का?

निशिताः- कस बघणार? अरे ते कोरोना पेशंट आणि कोरोणा मृत पेशंटला पूर्ण प्लास्टीकमध्ये गुंडाळून पँक केला जातो. मग कस ओळखणार आम्ही? ती बाँडी कोणाची आहे म्हणून.

वंदूः- बाई बाई बाई बाई.... म्हणजी हे तर वांधेच झाले म्हणावं. साहेब समजून आपण दूसऱ्यालाच म्हसणात जाळलं. देवा, देवा देवा..... कोणाला कळल तर उगाच शुक्लकाष्ट मागे लागायच.

निशिताः- होन खरय तुझ. पण यात आपली थोडी चुक आहे. हे डाँक्टर आणि पोलिसांच काम होत. त्यांनी याची खात्री

करायला पाहिजे होती. आपण पोलिसात यांची मिसिंग कम्प्लेट दिलेलीच होती.

वंदूः- हो बरोबर आहे बाई साहेब तुमचं. प्रशासनही झोपेतच काम करत म्हणावं.

निशिताः- बरं आंट्या मग पुढे काय झालं?

आंट्याः- मग काय होणार. मला डायरेक्टर कडून पैसे न मिळाल्याने मी तुला कस तोंड दाखवू? अस मला वाटू लागल आणि मी याच शहरात राहत असलेल्या माझ्या गांवच्या मित्राच घर गाठल. तो याच शहरात भाजीपाला विकतो. त्याला मी सर्व हकीकत सांगितली आणि ही गोष्ट कोणाला सांगू नकोस अशी गळ घातली. त्याने मला प्राँमिस केल. आणि माझी मदतही केली. कारण एक प्रसिध्द अभिनेता उपासमारीमुळे भाजी विकतो. हे जर कोणाला कळल असत तर याच्या मोठ मोठ्या बातम्या होऊन माझ्या करिअरची पुर्ण वाट लागली असती. आणि तेंव्हापासून

मी कोणी ओळखू नये म्हणून लूकबदलवून हे काम करु लागलो.

निशिताः- मग तू हे मला का सांगितल नाही?

आंट्याः- मी हे सांगणार होतो तुला. पण.

निशिताः- पण काय? पण काय आंट्या, बोल पण काय? (निशिता रडत बोलते.)

आंट्याः- पण हेच की, मी हे सार सांगायला आलो होतो आपल्या घरी. पण घराजवळ काही लोक जमले होते. आणि समोर माझा भलामोठा फोटो ठेवलेला होता. लोक माझ्या फोटोला पुष्पहार घालत श्रध्दांजली अर्पण करत होते. मी हे दृश्य बघून अवाक झालो. माझ्या प्रतिष्ठेला हानी पोहचू नये आणि मुल बाळ या महामारीत उपाशी राहू नये. म्हणून मी तीच संधी बघून तेथून गुपचूप कोणाला न दिसता जसा आलो तसाच काढता पाय घेतला. आणि तुला माहीतीय निशिता, तुला जे काल आपल्या

दाराजवळ पाकीट ठेवलेल सापडल ना... त्यात मीच दहा हजार रुपये तुमच्यासाठी पाठवले होते.

निशिताः- स्वारी आंट्या! अरे तु गेल्याची बातमी कळल्यावर मी पुर्णतः खचून गेली होती. आता आमच काय होणार? हा एकच प्रश्न माझ्या डोळया समोर दिसत होता. त्यातच तु त्या डायरेक्टर आणि प्रोड्युसरांकडून अँडव्हान्स म्हणून घेतलेले पैसे ते लोक परत मागू लागले आणि नको, नको ते घाणेरडे शब्द मला बोलू लागले.

आंट्याः- त्यांच्या आईचे त्यांच्या. त्यांची एवढी हिमत. आणि तु ऐकून घेतलस त्यांच.

निशिताः- मग काय करणार? दूसरा पर्यायच कुठे उरला होता माझ्याकडे त्या शिवाय. त्यावेळी तर अस वाटत होत हे जीवनच संपवून टाकावं! सारखे आत्महत्येचे विचार येत होते मनात. पण मी सावरले कारण मी मेल्यावर माझ्या चिमुरड्यांच काय होईल? हा प्रश्न मनात आला आणि मी स्वतःला सावरलं. तै प्रोड्युसर आहेना तो बी.कुमार काय नांव त्याच तो. तु दहा लाख रुपये अँडव्हान्स घेतलेत

सिनेमासाठी त्याच्याकडून. तो तर घरी त्याचे माणसे घेऊन आला होता. आणि दम देवून गेला. मेरे पैसे नही मिले तो मै घरका सामान उठाके ले जाऊंगा. अशी धमकी देवून गेला होता.

आंट्याः- अग मग धवलला फोन लावायाचा. तो बोलला असता त्यांच्याशी.

निशिताः- केला होता मी धवल भावजींना फोन! पण त्यांनी माझा फोनच नाही रिसिव्ह केला.

आंट्याः- अग कामात असेल तो. म्हणून कॉंल इग्नोर केला असेल त्याने. तु पुन्हा ट्राय करायचा होताना कॉंल.

निशिताः- तुझ म्हणण बरोबर आहे रे... मी एकवेळा नाही तब्बल दहावेळा कॉंल केले त्यांना. पण नाही उचलला त्यांनी फोन.

आंट्या:- अग मग तुझी ती फ्रेण्ड नाही का.... काय नांव तिच?

निशिता:- मैथीली.

आंट्या:- ह मैथीली... तिला कॉल केला असता.

निशिता:- आंट्या एखाद्यावर बिकट वेळ येते तेंव्हा कोणी कोणाच्या कामी येत नाही रे. पद, पैसा, प्रतिष्ठा आणि सभोवताली प्रसिध्दीच वलय असल ना, तेंव्हा सर्वच लूडबुड करतात आवती भोवती. आणि हे सारं नसल ना, तर कुत्रही पुसत नाही माणसाला. हे दिसून आल मला. आज माझ्यावर वेळ होती म्हणून मी तिला कॉल केला.

आंट्या:- बर काय म्हणाली मग ती? काय बोलली ती?

निशिता:- जी अपेक्षा तिच्याकडून नव्हती तेच बोलली ती. मला म्हटली यांपुढे मला कॉल करु नकोस. मला भिकारडी म्हटली ती; आंट्या मला भिकारडी म्हटली.

आंट्या:- शांत हो निशे शांत हो..... अग वाईट दिवस आल्या शिवाय सुखाची किंमत कळत नसते. आणि यानिमित्तान का होईना आपल्याला जग कळल. पण तु मोलकरीन म्हणून काम केलस हे खरय का?

निशिता:- हो खरय ते. कारण माझ्याकडे यांशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. रुमच रेंट, किराणा, लोकांची देणदारी चूकवण्यासाठी मीच वंदूला सांगितल आणि तिनेच माझ्यासाठी काम शोधून मला एकाघरी कामाला लावल. मी तिचे उपकार कसे विसरणार! कारण ज्यांना मी आपलं समजल. त्यांनी साथ सोडल्यावर माझ्याकामी आली ती ही वंदूताईच.

आंट्या:- हो खरय तुझं. आपण तिचे आभारच मानले पाहिजे.

वंदू:- कसले आभार साहेब? अहो माणसाच्या गरजेवेळी त्याच्या कामात पडण यालाच तर माणूसकी म्हणतात. म्हणूनच मी माझ कर्तव्य पूर्ण केल.

निशिताः- पण वंदूताई तुझ हे खरय. पण मी तुझे उपकार कसे विसरणार?

आंट्याः- होय वंदूताई श्रीमंतीच्या मिजाजात मिरत असलेल्या प्रत्येकाला आज या कोरोनाने दाखवुन दिल की, पैसा, पद प्रतिष्ठा हे जीवनापुढ फिक आहे. श्रीमंत माणूस श्रीमंताच्या तोवर कामी येतो. जो पर्यत त्याच्याकडे हे सर्व आहे. आणि यांतली एकही गोष्ट नसली ना.... तर ते आपल्या माणसालाही विसरतात. पण शेवटी गरीबाला मात्र माणसांची किव येते. आणि जगात पैशाने श्रीमंत असणाऱ्या लोकांपेक्षा तुमच्या सारखे मनाने श्रीमंत असलेल्या लोकांना माणूसकीच महत्व जास्त असतं. आणि तुला सांगू निशिता? अगं पद, पैसा आणि प्रतिष्ठा हे सार खोट आहे. कारण जगण्याला पद, पैसा, प्रतिष्ठा आणि प्रसिध्दीची गरज नसून. जीवन जगण्यासाठी प्रामाणिक मेहनतीची गरज असते हे आज “ कोरोनाने “ आपल्याला दाखवून दिल. आणि म्हणूनच या लॉंकडाऊन ने भल्याभल्यांचा लूकडाऊन केलाय असच म्हणाव लागेल.

निशिताः- हो खरय आंट्या तुझ. या ‘ लॉंकडाऊनने बघ ना आपला लूकच डाऊन केला ‘. अस म्हटल तरी वावग ठरणार नाही.

वंदूः- अहो मॅंडम आज दिवाळी हाय. आणि साहेबही जीवंत असल्याच समजल. यापेक्षा दुसरा आनंद कोणता असणार? आपण इथच रस्त्यावर बोलत बसण्यापेक्षा घरी जावूयात. मुलही वाट बघत असतील. बापाला बघितल्यावर मुलांच्या चेहऱ्यावरही हासू फुलेल. चला चला घरला जावूयात.

निशिताः- हो बरोबर आहे वंदू ताई तुमच. चला हो भाजीवाले. आता अस काय बघत बसलेत माझ्याकड? चला की आता घरला जावूयात आपल्या.

आंट्याः- होय चला चला. जावू आपण घरी.

निशिताः- अहो पण ही भाजीची गाडी कुठ घेऊन चाललात? एक दिग्गज अभिनेता भाजी विकतोय. हे कळल तर लोक काय म्हणतील?

आंट्याः- म्हणू दे लोकांना काहीही. पण या लॉंकडाऊन मध्ये या भाजीपाल्याच्या व्यवसायानच मला तारलं. आणि सुप्रसिध्द अभिनेता आंट्या पांडेच्या डोळयावर असलेली प्रसिध्दीच्या अहंकाराची पट्टी उतरली. यांपेक्षा मोठी शिकवण काय असणार?

निशिताः- होय खरय आंट्या तुझं. चल आता.

(आंट्या, निशिता आणि वंदू तिघ आनंदाने घराकडे जातात.)

---समाप्त----

कथा, पटकथा आणि संवाद –

**बाळासाहेब सुधाकर शिंपी**,

जळगांव ता.जि.जळगांव.


(खान्देश)


मो. नं. ९९२१७२९४७५.

ईमेल आयडीः-

balasaheb.siddesh@gmail.com.

## बाळासाहेब सुधाकर शिंपी,



चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं.

वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.


मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com